# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

**<u>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.१२.२०२२</u>**

## जिल्हा : कोल्हापूर

| मागील आठवड्यातील हवामान (०७.१२.२०२२ ते १३.१२.२०२२) | | | | | | | हवामान घटक | | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१४.१२.२०२२ ते १८.१२.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| ० | ० | ० | ० | ० | ०.८ | ०.० | पाऊस (मिमी) | | ९ | ५ | ० | ० | ० |
| ३२ | ३० | २९ | ३१ | ३० | २८.० | २८.२ | कमाल तापमान (अं.से.) | | २७ | २८ | २८ | २९ | ३० |
| १८ | १६ | १४ | १८ | १९ | २०.२ | २०.८ | किमान तापमान (अं.से.) | | २१ | २० | १८ | १६ | १४ |
| ० | ६ | ३ | २ | ७ | ६ | ७ | स. | ढग स्थिती (आकाश) | ८ | ७ | ५ | ३ | २ |
| ८ | ५ | २ | ४ | ८ | ८ | - | दु. | | | | | | |
| ८० | ८७ | ८९ | ९० | ८५ | ९५ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | | ८० | ७५ | ५२ | ६५ | ६१ |
| ६७ | ७४ | ४२ | ७८ | ७७ | ७५ | ८५ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | | ६२ | ५९ | ४७ | ३६ | ३४ |
| १ | १ | ० | १ | ० | ०.४ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | | १७ | १२ | ८ | ९ | १० |
| ई. | पु. | पु. | ई. | पु. | पु. | पु. | स. | वाऱ्याची दिशा | पु.आ. | पु.आ. | पु.आ. | पु.आ. | पु.आ. |
| ई. | पु.ई. | उ. | पु.ई. | पु. | पु. | - | दु. | | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२२ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| ०.० | १५२९.६ | ८४ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १४ ते १६ डिसेंबर दरम्यान आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे तसेच दिनांक १४ व १५ डिसेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान २७.० ते ३०.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १४ ते २१ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ५२ ते ८०% तर दुपारची सापेक्ष आद्रता ३४ ते ६२% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०८ ते १७ कि.मी. पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १८ ते २४ डिसेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड अ‍ॅप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट ई.च्या अंदाजासाठी “दामिनी” हे अँड्रॉइड मोबईल अ‍ॅप डाऊनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| **संदेश** | | कोल्हापूर जिल्ह्यामध्ये दिनांक १४ व १५ डिसेंबर दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठेवावा. |
| **गहू** | कांडी धरण्याची | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक १.५ किलो ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टर याप्रमाणात फवारणी करावी. |
| **रब्बी ज्वारी** | वाढीची अवस्था | ➢ वाढीच्या अवस्थेत ज्वारी पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येतो या किडीची पिल्ले व प्रौढ पानातील अन्नरस शोषण करतात व आपल्या शरीरातून मधासारखा गोड चिकट पदार्थ बाहेर टाकतात त्यावर काळी बुरशी वाढते त्यामुळे पिकाच्या अन्न तयार होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो व परिणामी उत्पादनात घट होते. या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळ्या रंगाचे चिकट सापळे एकरी ४ या प्रमाणात लावावे तसेच प्रादुर्भाव दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. |
| **हरभरा** | शाखीय वाढ | ➢ हरभऱ्यावरील घाटेअळीच्या नियंत्रणासाठी पक्षी थांबे उभारावेत व हेक्टरी ५ या प्रमाणे कामगंध सापळे लावावेत.<br>➢ हरभऱ्यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकील हे विषाणूजन्य कीटकनाशक ५०० मिली ५०० लिटर पाण्यातून प्रती हेक्टर याप्रमाणे फवारणी करावी. |

# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **ऊस** | आडसाली | ➢ डिसेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ३.६३ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.१७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३३ मिनिटे चालवावा. |
| **आंबा** | पालवी | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावर तुडतुडे कीड आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ एल.एल.३ मिली + सल्फर ८० डब्ल्यूपी २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ तज्ञ पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहाय्याने निरोगी जनावरांचे लाळ्या खुरकरत, घटसर्प आणि फऱ्या या रोगांपासून बचावासाठी लसीकरण करून घ्यावे. आजारी तसेच गाभण जनावरांचे लसीकरण करू नये. |

ठिकाण : १३.१२.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**